मुख्य वनसंरक्षक (प्रा) यवतमाळ, वनवृत्त यवतमाळ यांचे कार्यालय
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पळसवाडी कॅम्प, दारव्हारोड, यवतमाळ-४४५००१
फोन नं.०७२३२-२४२८९४/२४२११४ फॅक्स-०७२३२-२४२११४ ई-मेल-conytlyvt@gmail.com/ ccftyavatmal@mahaforest.gov.in

म.[illegible]चाचे:-

विषय:-**Forest Land - Pusad**

Diversion of ०.११८ ha. Forest land for laying of underground Optical Fiber Cable in favour of Reliance Jio, Infocomm Ltd., Nagpur, passing within the existing ROW of Pusad-Bhojala-Jambazar-Chikhali-Parwa-Lakhi, MDR-३२, PWD road in Comptt. No. ३७८ of Pusad Division, Pusad.

क्रमांक-मुवसं(य)/कक्ष-१०/वसं/ ४४६० /२०१७-१८.
यवतमाळ ४४५००१ दिनांक-८/ ०३/ २०१८.

संदर्भ-१.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपुर यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/आयडी-११९८४/२९३२, दि. ०३.०३.२०१८.

२.महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्र. एफएलडी-३६१७/प्र.क्र.३३२/फ-१०, दि. ११.०९.२०१७.

३.उपवनसंरक्षक, पुसद यांचे पत्र क्र. ब/सर्वे/फा.क्र.-७४(१)/१७९० दि. २०.०१.२०१८.

---ooo---

महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्र. एफएलडी-३६१७/प्र.क्र.३३२/फ-१०, दि. ११.०९.२०१७ अन्वये पुसद-भोजला-जामबाजार-चिखली-पारवा-लाखी प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ३२ कक्ष क्र. ३७८ मधुन वनक्षेत्रातुन जाणा-या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राईट ऑफ वे मधुन रिलायन्स जिओ ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याकरीता ०.११८ हे. वनजमीनीच्या प्रस्तावास अट क्र. १ ते १६ अटींस अधिन राहून तत्वत: मंजुरी प्रधान केलेली आहे.

उपवनसंरक्षक, पुसद यांचेकडील संदर्भीय पत्र क्र. ३ अन्वये दि. २५.०७.२०१७ रोजी सहाय्यक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा), पुसद यांच्या क्षेत्रीय दौ-यात मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि., नागपुर यांनी स्थानिक मजुराकडुन लाखी नियतक्षेत्रात पुसद-लाखी रस्त्याच्या कडेला प्रस्तावित ०.११८ हे. क्षेत्रात वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चे पुर्व परवानगी येण्यापुर्वी खोदकाम केल्याचे दिसुन आले. खोदकामाचा दि. २४.०७.२०१७ ते २५.०७.२०१७ पर्यत केल्याची नोंद उपवनसंरक्षक, पुसद यांनी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत उल्लघंन अहवालात केली आहे.

मा. अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपुर यांचेकडील पत्र क्र. १ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकरी, नागपुर यांनी केंद्र शासनाचे पत्र क्र. एफएन-११-४२/२०१७-एफसी, दि. २९.०१.२०१८ च्या मार्गदर्शक सुचनेनुसार वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग झालेल्या प्रस्तावाच्या संदर्भात मार्गदर्शक सुचनेतील परिच्छेद क्र. ३ (बी) उप परिच्छेद क्र. १ नुसार वनजमीनीचे वळतीकरण करण्यापुर्वी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग झाल्यास सदर प्रस्तावास खालील प्रमाणे प्रकल्प यंत्रणेकडुन दंड आकारण्याच्या सुचना आहेत.

*"The penalty for violation shall be equal to NPV of the forest land per hectare for each year of violation from the date of actual diversion as reported by the inspecting officer with maximum up to five (५) times the NPV plus १२ percent simple interest till the deposits is made ".*

वरील प्रमाणे NPV ची रक्कम व महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्र. एफएलडी-३६१७/प्र.क्र.३३२/फ-१०, दि. ११.०९.२०१७ तत्वत: मंजुरी पत्रातील मुद्यां क्र. ११ अन्वये प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने १.०० हे. अवनत वनक्षेत्रावर वनीकरण घेण्याच्या सुचना आहेत. व मुद्यां क्र. १० वर प्रस्तावाचे अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेकडुन भरण्यात येणारी सर्व रक्कम ॲडहोक कॅम्पाचे कॉर्पोरेशन बँक, एफसीएस बंगळुरु २१/१, तिसरा मजला, जेलिटा टॉवर्स मिशन रोड बंगळुरु येथील खाते क्र. १५०७८MIN५८१५२००९६९३ मध्ये जमा करण्याकरीता खालील प्रमाणे मागणी पत्र (Demand Note) तयार करुन पाठविण्यात येत आहे. त्यानुसार रक्कम जमा करण्याकरीता प्रकल्प यंत्रणा यांना आपले स्तरावरुन निर्देश देण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति हेक्टर | भरावाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने १.०० हे. अवनत क्षेत्रावर वनीकरण घेणे. | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म. रा. नागपुर यांचे कडील पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/मुले/अंदाजपत्रक/१३१२ दि. १३.११.२०१३ मधील मॉडेल नं. ५ नुसार सन २०१७-१८ करीता प्रति हे. दर ८,७२,०४४ प्रमाणे | ८,७२,०४४/- |
| २ | NPV ची रक्कम | ●शासन निर्णय क्र. एस-३०/११०६/प्र.क्र.१८९/फ-१०, दि. २८.११.२००८ अन्वये प्रवर्ग-३ दाट जंगला करीता प्रति हेक्टरी ८,०३००० प्रस्तावित होते. त्याप्रमाणे ०.११८ हे. करीता ८,०३००० X ०.११८ = ९४,७५४/-<br>●उपवनसंरक्षक, पुसद यांचेकडील पत्र क्र. उवसं/शिली/१६०३, दि. १८.१२.२०१७ अन्वये प्रस्तावित क्षेत्राव्यतिरिक्त १५० मी. लांब व ०.४० मी रुंदीमध्ये अधिकची कामे झाली आहे. क्षेत्रफळ ०.००६ हे. X ८,०३००० = ४,८१८/- + ९४,७५४ = ९९,५७२/- | ९९,५७२/- |
| ३ | वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या भंगाच्या संदर्भात प्रकल्प यंत्रणेकडुन दंडात्मक रक्कम NPV च्या रक्कमेच्या प्रती हे. प्रती वर्ष १२ टक्के व्याज दरानुसार वसुल करणे. | ०.१२४ हे. करीता NPV ची रक्कम ९९,५७२ वर १२% व्याज =११,९४८.६४/- | ११,९४९/- |
| | **एकुण रक्कम** | -- | ९,८३,५६५.००/- |

NPV च्या रक्कमेच्या प्रती हे. प्रती वर्ष १२ टक्के व्याज डिमांड नोट प्राप्त झाल्याच्या दिनाकापासुन उपवनसंरक्षक, पुसद यांनी ठरवुन दिलेल्या कालावधीत प्रकल्प यंत्रणेनी कॅम्पा खात्यात रक्कम जमा न केल्यास प्रती दिवस १२ टक्के व्याज वसुल करणेत येईल अशा सुचना प्रकल्प यंत्रणेस देण्यात याव्या.

**मुख्य वनसंरक्षक (प्रादे.)**
**यवतमाळ.**

प्रति,
उपवनसंरक्षक (प्रा.),
पुसद.

प्रतिलिपी-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रतिलिपी-मे. रिलायन्स जिओ इन्फोकॉम लि., नागपुर यांना माहिती करीता अग्रेषित.